**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,**
**जे. एन. हेरेडिया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.**
**दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०२९/ ३६** **ईमेल आयडी-aao.hrms@mahakosh.in**

क्र.संलेको/माहे मे-२०२१/प्रशा राप सलेअ/प्रशा बदली २०२१/न.क्रं.१४३/१९१ दि. ३१/ ०३ /२०२१

संदर्भ:- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.०९.०४.२०१८
२. शासन वित्त विभाग, परिपत्रक क्र.संलेको २०१८/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-२, दि.२०.०४.२०१८

## //परिपत्रक//

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतुदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गामधील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या माहे मे-**२०२१** मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

१. सध्याच्या कार्यरत पदावर ज्या अधिकाऱ्यांना किमान तीन व त्यापेक्षा जास्त वर्षाचा कालावधी झाला आहे (३१ मे २०१८ व त्यापुर्वीचे आदेश व ३० जून २०१८ पर्यंत रुजू झालेले अधिकारी) अशा सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांची यादी, सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील रिक्त पदांची यादी (अवघड / बिगर अवघड क्षेत्रनिहाय) अनुक्रमे परिशिष्ट “अ” व “ब” मध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे.
२. यावर्षीची प्रशासकीय बदली प्रक्रिया ही मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (HRMS) या संगणकीय प्रणालीमधूनच करण्यात येणार आहे. त्यामुळे बदलीकरीता मागविण्यात येणारे १० पसंतीक्रमही प्रणालीमधूनच स्विकारले जातील, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.
३. प्रणालीमधून बदलीसाठीचे पसंतीक्रम सादर करण्यासाठी, अधिकाऱ्यांनी त्यांचा सेवार्थ क्रमांक हाच वैयक्तिक लॉगिन ID व पासवर्ड म्हणुन वापरावा.
४. बदलीपात्र अधिकाऱ्यांनी आपले बदलीसाठीचे पसंतीक्रम वर नमुद केलेल्या Login Id मधूनच भरणे अनिवार्य आहे.
५. बदलीकरीताचे पसंतीक्रम हे प्रणालीद्वारेच स्विकारले जाणार असल्याने ज्या अधिकाऱ्यांचे पसंतीक्रम प्रणालीद्वारे प्राप्त होणार नाहीत, त्यांना दि.०९/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रशासकीय सोयीनुसार पदस्थापना देण्यात येईल, तसेच अशा अधिकाऱ्यांच्या बदलीच्या पदस्थापनेत अंशत: बदलाकरीताचा अर्ज देखील विचारात घेतला जाणर नाही.

६. **पसंतीक्रम देताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात :-**

(I) पसंतीक्रम देताना बदलीपात्र अधिकाऱ्यांनी शासन निर्णय दि.०९/०४/२०१८ व शासन वित्त विभाग परिपत्रक दि.२०/०४/२०१८ मधील तरतुदींचा संपुर्ण अभ्यास करुन पसंतीक्रम द्यावा.

(II) **HRMS प्रणालीत पसंतीक्रम नोंदविताना पसंतीक्रम टॅबच्या Drop Down मेनू मध्ये रिक्त पदांची यादी दिसेल. परंतु संबंधितांनी पसंतीक्रम देताना संचालनालयाने प्रसिध्द केलेली सलेअ संवर्गाच्या रिक्त पदांची यादी व बदलीपात्र अधिकाऱ्यांच्या यादीमधीलच कार्यालये विचारात घ्यावीत. सदर दोन यांद्यांबाहेरील कार्यालयांची पसंती विचारात घेतली जाणार नाही.**

(III) संचालनालयाने प्रसिध्द कलेल्या रिक्त पदांच्या यादीमधील ज्या कार्यालयासमोर **"निर्बाध रिक्त नाही/प्रस्तावित"** असा शेरा असेल अशा कार्यालयातील पदे विनंती/अशंत बदल/अथवा अन्य इत्यादी कारणांने भरली गेल्यास सदर कार्यालयांकरीता दिलेला पसंतीक्रम विचारात न घेता अधिका-यांनी दिलेले अन्य विकल्प विचारात घेतले जातील याची नोदं घ्यावी.

(IV) **ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या कार्यरत जिल्हयात दोन पदावधी पुर्ण झाले आहेत, त्यांना जिल्हाबदल करुन पदस्थापना द्यावयाची असल्याने**, अशा अधिकाऱ्यांनी पसंतीक्रम सादर करताना सदर बाबीची नोंद घेऊन बदलीसाठी त्यांच्या पसंतीच्या जिल्हयातील कार्यालयांचे पसंतीक्रम सादर करावेत. तसे न केल्यास प्रशासकीय निकडीनुसार त्यांचा जिल्हाबदल करुन पदस्थापना देण्यात येईल.

(V) **ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या कार्यरत जिल्हयात दोन पदावधी पुर्ण झाले आहेत** व ते जिल्हा बदलास पात्र आहेत तसेच ते सा.प्र.वि शासन निर्णय दि.०९/०४/२०१८ मधील अ.क्र.१ ते ६ मधील प्राधान्यक्रमात नसताना देखिल कार्यरत जिल्हयातील पदांचेच विकल्प दिल्याचे आढळल्यास ते विचारात न घेता प्रशासकीय कारणास्तव पदस्थापना देण्यांत येईल याची नोंद घ्यावी . प्राधान्यक्रमात येत असल्यास त्याबाबतची संबंधित कागदपत्रे विकल्पासोबत जोडावीत.

(VI) प्राधान्यक्रमात येणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्राधान्यक्रमाचे तपशिल / विवरण मोजक्याच शब्दांत HRMS प्रणालीत उपलब्ध करुन दिलेल्या "कारण" या टॅब मध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

(VII) पसंतीक्रम प्रणालीमध्ये नोंदविल्यानंतर SUBMIT & PRINT या टॅब वर क्लिक केल्यानंतरच Print घेता येईल. ***मात्र एकदा पसंतीक्रम SUBMIT & PRINT क्लिक केल्यानंतर ते पुन्हा बदलता येणार नाहीत. यास्तव SUBMIT & PRINT करण्यापुर्वी पसंतीक्रम योग्य रित्या भरले असल्याची खातरजमा करण्याची दक्षता घ्यावी.*** सदर प्रिंटवर स्वाक्षरी करुन त्याची Scan कॉपी aao.hrms@mahakosh.in या ई - मेल वर पाठविण्यात यावी. ***तसेच स्वाक्षरी असलेली मुळ प्रत संचालनालयास सादर करणे अनिवार्य राहील.*** जे अधिकारी प्राधान्यक्रमात येत असतील त्यांना त्या पृष्ठयर्थ संबंधित कागदपत्रे प्रिंट कॉपी सोबत जोडणे आवश्यक राहील.

(VIII) **दि. १४ /०४/२०२१ पर्यतंच प्रणालीमध्ये पसंतीक्रम सादर करावेत. पसंतीक्रम सादर केल्यानंतर त्याची PRINT घेवुन ती आवश्यक कागदपत्रांसह दिनांक २०/०४/२०२१ पर्यंत संचालनालयास सादर करावी. एकदा दिलेला विकल्प हा अंतिम राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

(IX) प्रशासकीय बदलीची प्रक्रिया HRMS प्रणालीद्वारे राबविण्यात येत असल्याने अधिकाऱ्यांनी त्यांचे बदलीसाठीचे पसंतीक्रम प्रणालीद्वारे काढलेल्या Print ची हार्ड कॉपी स्वाक्षरीसह संचालनालयास सादर करणे अनिवार्य राहील.

(X) HRMS प्रणालीद्वारे पसंतीक्रम नोंदविण्याकरीता अधिकाऱ्यांना **Google Chrome** या Web Browser चा वापर करुन संचालनालयाच्या महाकोष या संकेतस्थळावर लॉगिन होता येईल. उपरोक्त संकेतस्थळावर लॉगिन होण्यासाठी अडचणी आल्यास Browsing History Delete करून प्रणालीमध्ये पुन्हा लॉगिन करावे.

(XI) सदर प्रणालीद्वारे फक्त प्रशासकीय बदलीपात्र अधिकारीच अर्ज सादर करु शकतील.

(XII) महाकोष या संकेतस्थळावर जाऊन HRMS प्रणालीमधून बदलीच्या पसंतीक्रमाचे अर्ज सादर करण्याबाबतचा Flow Chart सोबत देण्यात आला आहे.

(XIII) सदर HRMS कार्यप्रणाली अद्ययावत करण्याचे काम सुरु आहे. सद्यस्थितीत फक्त प्रशासकीय बदल्यांचीच कार्यवाही प्रणालीमधुन करावयाची असल्याने फक्त **बदली** हा TAB कार्यान्वीत आहे.

(XIV) हे परिपत्रक प्रसिध्द होण्यापुर्वी संचालनालयास प्राप्त झालेले प्रशासकीय बदलीचे पसंतीक्रम दफ्तरी दाखल करण्यात येत आहेत.

(XV) सन २०२० मध्ये बदली आदेश निर्गमित झालेले असूनही अद्याप पर्यंत बदलीच्या पदावर रुजू न झालेल्या अधिकाऱ्यांनी तात्काळ संचालनालयास याबाबतची वस्तुस्थिती कळवावी.

(XVI) शासन निर्णय दि.०९/०४/२०१८ मधील नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या तरतूदीनुसार अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधीच्या तक्रारीचे निवारण आणि वैयक्तिक कामे करुन घेण्यासाठी खासदार, आमदार, राजकिय संघटनांचे कार्यकर्ते आणि इतर अशासकिय व्यक्ती यांच्यामार्फत त्यांची गाऱ्हाणी मा.मंत्र्याकडे नेऊ नयेत आणि तसे केल्याचे आढळून आल्यास ते शिस्तभंग कारवाईस पात्र ठरतील. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

(ज. र. मेनन)
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**